# प्रेस नोट

दिनांक १३/१०/२०२०

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, घटक अमरावती |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.नकुल हरीकृष्ण आडे, वय – ४३ वर्ष, पद – अव्वल कारकुन, वर्ग – ३, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | दि. १३/१०/२०२० चे १६:२८ वा. दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १७,१००/रु. |
| ५ | स्विकारलेली लाचेची रक्कम | १७,१००/रु. |
| ६ | कारण | सदर तक्रारीचे अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे यांनी १७,१००/– रुपयाची लाचेची मागणी करुन पंचासमक्ष १७,१००/– रुपये लाच रक्कम स्विकारली. |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांनी दिनांक १३/१०/२०२० रोजी दिलेल्या तक्रारीवरून तक्रारदार यांची गाडी करार पध्दतीने जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे चालते. त्यांचे गाडी भाडयाचा दर महिन्याचे २६,७००/– प्रमाणे असे तिन महिन्याचा एकुण ७६,०९५/– रू.चा चेक टिडीएस कपात करून जिल्हाधिकारी कार्यालयातुन तक्रारदार यांना प्राप्त झाला. त्यानुसार मिळालेल्या चेक चे ४,०००/– रू. ठरल्याप्रमाणे तिन महिन्याचे १२,०००/– रू. असे श्री.आडे यांनी चेक काढुन दिल्याबद्दल मागणी केली असल्याची तक्रार दिली. सदर तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी केली असता पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री.आडे यांनी पंचासमक्ष १७,१००–/ रूपये ची लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले व सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष १७,१००/– रुपये लाच रक्कम स्वीकारल्यावरून आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेवून त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदयान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे सा. व अप्पर पोलीस अधिक्षक मा.श्री.पंजाबराव डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती श्वेता मिश्रा, म.पो.हवा.माधुरी साबळे, पो.कॉ.पंकज बोरसे, पो.कॉ.शैलेश कडु, चालक पो.ना.अकबर हुसेन यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी केले आहे.

संपर्क : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, २५५३०५५,
टोल फ्रि नंबर–१०६४.

(श्वेता मिश्रा)
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.

Scanned with CamScanner